**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, MAR–APR, 2018, VOL- 5/44*

# शालेय शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानाचा अभ्यास

**दिपक चव्हाण, Ph. D.**

*टिळक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे–३०*

**Abstract**

*प्रस्तुत संशोधन लेखात संशोधकाने शालेय शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानाचा स्तर शोधण्याचे ठरविले होते. या संशोधनाची उद्‌दिष्टे शालेय शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान तपासणे, शालेय शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानाची लिंगभाव, व्यावसायिक शिक्षण, अध्यापन अनुभव आणि समुपदेशनाबाबतचे प्रशिक्षण यानुसार तुलना करणे.*

*सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला असून, जनसंख्येमध्ये पुणे शहरातील माध्यमिक शाळातील शिक्षकांचा समावेश केला आहे. संशोधनासाठी ५०९ शिक्षक नमुना म्हणून निवडले आहेत. संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान व टी परीक्षिका या संख्याशास्त्रीय तंत्रांचा वापर करण्यात आला. या संशोधनाअंती पुढील निष्कर्ष प्राप्त झाले : शालेय शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान चांगले आहे, शिक्षिकांचे समुपदेशन ज्ञान शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानापेक्षा जास्त आहे. शिक्षक आणि शिक्षिकांच्या समुपदेशन ज्ञानात असणारा फरक सार्थ आहे. शिक्षणशास्त्र पदवीधारक शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान शिक्षणशास्त्र पदविकाधारक शिक्षकांपेक्षा अधिक आहे. शिक्षणशास्त्र पदवी आणि पदविका प्राप्त शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानातील फरक सार्थ आहे. जास्त अनुभवी शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान कमी अनुभवी शिक्षकांपेक्षा जास्त आहे. कमी अनुभव व जास्त अनुभव असलेल्या शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानातील फरक सार्थ आहे. समुपदेशन विषयक प्रशिक्षित व अप्रशिक्षित शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान सारखेच आहे. समुपदेशन विषयक प्रशिक्षित व अप्रशिक्षित शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानातील फरक सार्थ नाही.*

**महत्वाचे मुद्दे :** *शालेय शिक्षक, समुपदेशन ज्ञान*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## १. प्रस्तावना

शालेय पातळीवर मार्गदर्शन व समुपदेशन सेवा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शालेय अधिकाऱ्यावर मुख्याध्यापक व शिक्षण यांच्यावर असते. परंतु मार्गदर्शन अथवा समुपदेशनाचे काम स्थानिक, राज्य व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक संस्था. या क्षेत्रात कार्य करीत असतात. औपचारिक पातळीवर कार्य करणाऱ्या सरकारी व निमसरकारी खात्यांप्रमाणेच खाजगी संघटना, संस्था या क्षेत्रात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष काम करताना दिसून येतात.

शासकीय स्तरावर चालविल्या जाणाऱ्या योजनांचा विचारं करता. अत्तापर्यंत शिक्षण विषयक जेवढे आयोग किंवा समित्या स्थापन करण्यात आल्या किंवा धोरणे आखली गेली. त्यामध्ये ही या विषयीच्या भूमिका मांडण्यात आल्या आहेत. मार्गदर्शन व समुपदेशन याविषयी प्रशिक्षण देणाऱ्या दोन शासकीय संस्था आहेत.

१. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद. (NCERT) मार्फत एक वर्षाचा व्यावसायिक मार्गदर्शन व समुपदेशन विषयक पदविका अभ्यासक्रम चालविला जातो.
२. महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद. (MSCERT) अंतर्गत येणारी व्यावसाय मार्गदर्शन निवड संस्था, मुंबई ही राज्य स्तरावर काम करते. संस्थेमार्फत एक वर्षाचा व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन विषयक पदविका अभ्यासक्रम चालविला जातो. तसेच विभागीय स्तरावर व्यवसाय विज्ञ हे २१ दिवसांचे प्रशिक्षण घेतले जाते. वरील

दोन्ही संस्थांमार्फत असणारी सेवा सर्व शिक्षकांसाठी पुरेशी नाही. या वर्षी महाराष्ट्रात प्रथमत एस.एस.सी. बोर्डाच्या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी कलमापन चाचणी घेण्यात आली आहे. हे पाहता भविष्यात शालेय शिक्षकांची विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन करण्याची जबाबदारी वाढली आहे.

आज बदलत्या सामाजिक आर्थिक व कौटुंबिक परिस्थिती मध्ये प्रत्येक व्यक्तीला काही ना काही समस्या निर्माण होत आहेत. मुलांचा शैक्षणिक विकास होत असताना त्यांना अनेक अडचणी येतात. त्यावेळी परिवारातून आई–वडीलांचा वैचारिक आधार दिला जातो. यालाच उपदेश किंवा सल्ला असे म्हटले जाते. परंतू तो पुरसे ठरत नाही. कारण ज्या प्रक्रियेतून मुलांचा शैक्षणिक विकास साधण्याचा प्रयत्न होतो ती म्हणजे शिक्षक प्रक्रिया होय. यामध्ये सर्वात महत्वाची व्यक्ती असते शिक्षक.

आजच्या परिस्थितीत शिक्षकाची भूमिका फक्त ज्ञानदानाची किंवा अध्यापन करण्याची इतपत मर्यादित राहिली नाही कारण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या ज्या त्याच्या शैक्षणिक विकासास अडथळा निर्माण करतात. त्या दूर करण्यासाठी शिक्षकाची भूमिका मार्गदर्शक समुपदेशक अशी ही असणे गरजेचे झाले आहे. कारण फक्त शिक्षक ही भूमिका विद्यार्थ्यांच्या विषयांच्या समस्यापलिकडे समस्यांकेडे दुर्लक्ष होवू शकते. पण त्याच्या जर इतर समस्या आहेत त्या दूर केल्या शिवाय त्याच्या शैक्षणिक विकासाला गती मिळणार नाही त्याची जाणीव ठेवून शिक्षकांना आपली भूमिका व्यापक करावी लागणार आहे. तरच शिक्षणाचे जे उद्दिष्ट आपण मानतो ते म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे साध्य होवू शकते. सद्यस्थितीमध्ये शालेय विद्यर्थ्याच्या समस्या हया भिन्न–भिन्न स्वरूपाच्या दिसून येतात. अशावेळी शिक्षकाला फक्त विषयाची माहिती संप्रेषित करणारा घटक किंवा मार्गदर्शक म्हणून नाही तर त्यासाठी शिक्षकाला समुपदेशनाचे कौशल्य विकसित करून घेणे आवश्यक आहे. शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या व्यवस्थांची, संस्थांची कमतरता आहे. परंतू काळाची गरज आहे की प्रत्येक शिक्षक हा एक उत्तम समुपदेशक असणे आवश्यक आहे. वरील परिस्थितीचा विचार करता संशोधकाला शालेय शिक्षकांमध्ये समुपदेशनाचे ज्ञान असावे.

## २. संशोधनाची गरज

शाळेमध्ये फक्त विषयांच्या अध्यापनावर लक्ष देऊन चालणार नाही. शाळेतील मुले त्यांची पार्श्वभूमी, त्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न हे सर्व समजून घेऊन भविष्यासाठी त्यांना तयार करणे गरजेचे आहे. शाळेमध्ये येणारे प्रत्येक मूल महत्वाचे आणि त्याचा विकास करणे ही आपली जबाबदारी आहे. हे तत्व शिक्षक, मुख्याध्यापक या सर्वांनीच आत्मसात करावे लागेल. या पार्श्वभूमीवर शाळेमध्ये प्रत्येक मुलाला समुपदेशनाची गरज तीव्रतेने भासू लागली आहे. आज विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच व्यक्तिमत्व विकास त्याच्या व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूचा विकास साधण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक घटकाला प्रयत्न करावा लागेल. विद्यार्थ्यांच्या मानसिक, शारीरिक स्वास्थाचा ही विचार करावा लागेल. कारण विदयार्थ्यांना अभ्यासातील समस्या बरोबरच मानसिक व शारीरिक समस्याही ही भेडसावत आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थी स्वत: आपल्या समस्या सोडवू शकत नाही. त्याला इतरांच्या मदतीची आवश्यकता असते. अशावेळी पालकांची जबाबदारी आहे पण ते वेळ देवू शकत नाही. आणि जरी दिला तरी त्याची समस्या सोडविण्याची तज्ञता त्यांच्याकड नसते. तशीच अडचण इतर नातेवाईकांची असते. या ठिकाणी शिक्षकाची भूमिका महत्वाची ठरते.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

अध्यापनाबरोबरच विद्यार्थ्याची समस्या सोडविण्यासाठी मदत करू शकतो काही प्रमाणात मार्गदर्शन किंवा समुपदेशन करू शकतो. पण त्यातली तज्ञता असेल तर अधिक चांगल्याप्रकारे समस्या समाधान करता येवू शकतो. पण यासाठी शिक्षकांकडे समुपदेशनाचे ज्ञान चांगले असणे आवश्यक आहे जेणेकरून तो आपल्या विद्यार्थ्यांना योग्य रितीने समुपदेशन करू शकेल. शालेय शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान कितपत आहे या हेतुने प्रस्तुत संशोधन हाती घेतले.

**३. संशोधन समस्या विधान**

शालेय शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानाचा अभ्यास करणे.

**४. संशोधन समस्या विधानातील संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या**

सदर संशोधनात संशोधकाने काही संज्ञा वापरल्या आहेत. त्यांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

**१. शालेय शिक्षक –** औपचारिक शिक्षण पध्दतीमध्ये इ. ५ वी ते १० वी पर्यंत वर्ग असलेल्या माध्यमिक शाळेमध्ये अध्यापन करणारी व्यक्ती म्हणजे शिक्षक होय.

**२. समुपदेशन ज्ञान–**समुपदेशनाचे सैध्दांतिक घटक, समस्याग्रस्त व्यक्ति, विद्यार्थी या विषयीचे ज्ञान व समस्याग्रस्त व्यक्तिला स्वत:शी व त्याच्या भोवतालच्या परिस्थितीशी परिणामकारक समोयाजन करण्यास मदत करणे याची माहिती असणे म्हणजे समुपदेशन ज्ञान होय.

**५. संशोधनाची उद्दिष्टे**

१) शालेय शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान तपासणे.

२) शालेय शिक्षक आणि शिक्षिका यांच्या समुपदेशन ज्ञानाची तुलना करणे.

३) शिक्षणशास्त्र पदवी प्राप्त शिक्षक आणि शिक्षणशास्त्र पदविका प्राप्त शिक्षक यांच्या समुपदेशन ज्ञानाची तुलना करणे.

४) कमी अध्यापन अनुभव आणि जास्त अध्यापन अनुभव असणाऱ्या शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानाची तुलना करणे.

५) समुपदेशन प्रशिक्षित आणि समुपदेशन अप्रशिक्षित शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानाची तुलना करणे.

**६. संशोधनाची गृहितके**

१. शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या समस्यांची जाण आहे आणि ते समुपदेशनाचे महत्व जाणतात.

२. शिक्षकांना विद्यार्थ्यांना समुपदेश करावे लागते.

३. शिक्षकांना समुपदेशाना विषयी सामान्य माहिती आहे.

४. काही शिक्षकांचे समुपदेशन विषयक प्रशिक्षण झालेले आहे.

५. महाराष्ट्रातील बहुतेक शाळांमध्ये स्वतंत्र समुपदेशक नाहीत.

**७. संशोधन परिकल्पना**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने संशोधन परिकल्पना आणि शून्य परिकल्पना मांडल्या होत्या. त्या पुढीलप्रमाणे :

अ) **संशोधन परिकल्पना**

१. शिक्षक आणि शिक्षिका यांच्या समुपदेशन ज्ञानामध्ये फरक आढळेल.

२. शिक्षणशास्त्र पदवीप्राप्त आणि शिक्षणशास्त्र पदविकाप्राप्त शिक्षकांच्या समपुदेशन ज्ञानामध्ये फरक आढळेल.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

३. कमी अनुभव व जास्त अनुभवी शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानामध्ये फरक आढळेल.

४. समुपदेशन विषयक प्रशिक्षित व समुपदेशन विषयक अप्रशिक्षित शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानामध्ये फरक आाढळेल.

**ब) शून्य परिकल्पना**

१. शिक्षक आणि शिक्षिका यांच्या समुपदेशन ज्ञान कसोटीतील प्राप्तांकांच्या मध्यमानात कोणताही सार्थ फरक आढळणार नाही.

२. शिक्षणशास्त्र पदवीप्राप्त आणि शिक्षणशास्त्र पदविकाप्राप्त शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञान कसोटीतील प्राप्तांकांच्या मध्यमानात कोणताही सार्थ फरक आढळणार नाही.

३. कमी अनुभवी व जास्त अनुभवी असलेल्या शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञान कसोटीतील प्राप्तांकांच्या मध्यमानात कोणताही सार्थ फरक आढळणार नाही.

४. समुपदेशन विषयक प्रशिक्षित व समुपदेशन विषयक अप्रशिक्षित शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान कसोटीतील प्राप्तांकांच्या मध्यमानात कोणताही सार्थ फरक आढळणार नाही.

**८. संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा**

**अ) संशोधनाची व्याप्ती**

प्रस्तुत संशोधन पुणे शहरातील शाळांमध्ये अध्यापन करणाऱ्या शालेय शिक्षकांच्या समुपदेशन विषयक ज्ञानाशी संबंधित आहे.

**ब) संशोधनाची मर्यादा**

या संशोधनाचे निष्कर्ष शिक्षकांनी माहिती संकलन साधनाला दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून राहतील.

**क) संशोधनाच्या परिमर्यादा**

१. सदर संशोधन मराठी माध्यमातील शिक्षकांपुरते मर्यादित आहे.

२. सदर संशोधन पुणे शहरातील माध्यमिक शाळांपुरते मर्यादित आहे.

३. सदर संशोधन शालेय शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानापुरतेच मर्यादित आहे.

४. सदर संशोधनासाठी समुपदेशन ज्ञान कसोटी संशोधक निर्मित आहे.

**९. संशोधन कार्यपध्दती:**

**९.१ संशोधन पध्दती –**

प्रस्तुत संशोधनाचा विषय, स्वरूप आणि उद्दिष्टे विचारात घेवून संशोधकांचे सर्वेक्षण या संशोधन पध्दतीचा अवलंब केला होता. याद्वारे पुणे शहरातील माध्यमिक शाळांतील शिक्षकांचे समुपदेशन ज्ञानाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करण्यात आला.

**९.२ जनसंख्या आणि नमुना–**

सदर संशोधनासाठी पुणे शहरातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळातील शिक्षकांचा जनसंख्येमध्ये समावेश होतो. नमुना म्हणून पुणे शहरातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांतील एकूण ५०९ शिक्षकांचा समावेश केला आहे.

यामध्ये शिक्षक–शिक्षिका विज्ञान व विज्ञानेतर पदवीधारक, बी. एड व डी. एड शिक्षक, कमी अनुभवी व जास्त अनुभवी शिक्षक आणि समुदेशन विषयक प्रशिक्षित व अप्रशिक्षित शिक्षक यांचा समावेश करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये संशोधकाने शाळा निवडीसाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर केला तर या शाळातील शिक्षक निवडीसाठी प्रासंगिक व सहेतुक नमुना निवड पध्दतीचा वापर केला आहे.

**कोष्टक क्र. १ नमुना वर्गीकरण**

| अ. क्र | प्रवर्ग | शिक्षक संख्या | एकूण शिक्षक |
|---|---|---|---|
| १. | शिक्षक | १८२ | ५०९ |
| | शिक्षिका | ३२७ | |
| २. | शिक्षणशास्त्र पदवी | ४०५ | ५०९ |
| | शिक्षणशास्त्र पदविका | १०४ | |
| ३. | कमी अनुभव | ७६ | ५०९ |
| | जास्त अनुभव | ४३३ | |
| ४. | प्रशिक्षित | २३३ | ५०९ |
| | अप्रशिक्षित | २७६ | |

**९.३ माहिती संकलनाची साधने–**

सदर संशोधनासाठी माहिती संकलनासाठी संशोधक विकसित केलेली समुपदेशन ज्ञान कसोटी साधनाचा उपयोग केला. माध्यमिक शाळेतील शिक्षकांना समुपदेशन विषयक ज्ञान किती प्रमाणत संपादित केले आहे. याचे मूल्यमापन करण्यासाठी संशोधकाने समुपदेशन ज्ञान कसोटी तयार केली. समुपदेशन ज्ञान कसोटीचे विकसन करताना प्रथम समुपदेशन ज्ञान कसोटीचा प्रारंभिक मसुदा तयार करण्यात आला. या कसोटीसाठी शालेय विद्यार्थी मुख्य घटक मानून आशय ठरविताना विविध क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करण्यात आली तसेच शिक्षकांशी सुध्दा चर्चा करण्यात आली व त्यानुसार आशय घटक व आशय ठरविण्यात आला. या आशयामध्ये समुपदेशन सिध्दांत, समुपदेशन संकल्पना, समुपदेशन प्रक्रिया आणी समुपदेशन कौशल्य या घटकांचा समावेश करण्यात आला. या घटकांवर प्रश्न तयार केले हे प्रश्न मार्गदर्शक आणि विषय तज्ज्ञ यांच्याकडून तपासून घेतले व त्यांच्याशी केलेल्या चर्चेनुसार प्रश्नांमध्ये व पर्यायांमध्ये बदल करून कसोटी तयार करण्यात आली. समुपदेशन ज्ञान कसोटीमध्ये एकूण ३० प्रश्न आहेत. प्रत्येक अचूक उत्तरासाठी एक गुण देण्याचे ठरविले कसोटीमध्ये एकूण ३० प्रश्न असल्याने ही कसोटी एकूण ३० गुणांची होती.

**समुपदेशन ज्ञान ठरविण्यासाठी गुणमर्यादा**

या कसोटीत मिळालेल्या गुणांचे विविध गटात विभाजन केले. शिक्षकांची समुपदेशन ज्ञानासाठी खालील गुणमर्यादा ठरविण्यात आल्या.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**कोष्टक क्र २ समुपदेशन ज्ञान ठरविण्यासाठी गुणमर्यादा**

| अ. क्र | गुणमर्यादा | समुपदेशन ज्ञान |
|---|---|---|
| १ | २६—३० | उत्कृष्ट |
| २ | २१—२५ | चांगले |
| ३ | १६—२० | समाधानकारक |
| ४ | ११—१५ | असमाधानकारक |
| ५ | ६—१० | अल्प |
| ६ | ०—५ | अत्यल्प |

**९.४ संख्याशास्त्रीय तंत्र—**

प्रस्तुत संशोधनात प्राप्त माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन करण्यासाठी संशोधकाने मध्यमान, प्रमाणविचलन आणि टी—परिक्षिका या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर केला आहे.

**१०. माहितीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन :**

या संशोधनात शालेय शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानाचा अभ्यास करायचा असल्याने समुपदेशन ज्ञान कसोटीद्वारे शिक्षकांना मिळालेल्या गुणांची वर्गांतर श्रेणी तयार करून वारंवारिता काढण्यात आली व त्यानुसार माध्यमान काढून समुपदेशन ज्ञान ठरविण्यात आले. तसेच या संशोधनात शिक्षक आणि शिक्षिका, शिक्षणशास्त्र पदवीप्राप्त व शिक्षणशास्त्र पदविकाप्राप्त शिक्षक, कमी व अधिक अनुभव असलेले शिक्षक, प्रशिक्षित व अप्रशिक्षित शिक्षक यांचा समुपदेशन ज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी वरील विविध गटात संकलित माहितीचे वर्गीकरण करून विश्लेषण करण्यात आले.

**कोष्टक क्र ३ शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान**

| अ क्र | घटक | एकूण | मध्यमान | समुपदेशन विषयक ज्ञान |
|---|---|---|---|---|
| १ | सर्व शिक्षक | ५०९ | २२.४८ | चांगले |
| २ | शिक्षक | १८२ | २०.१७ | चांगले |
| ३ | शिक्षिका | ३२७ | २४.७९ | चांगले |
| ४ | शिक्षणशास्त्र पदवीधारक शिक्षक | ४०५ | २३.८९ | चांगले |
| ५ | शिक्षणशास्त्र पदविकाधारक शिक्षक | १०४ | २१.०७ | चांगले |
| ६ | कमी अनुभवी शिक्षक | ७६ | २१.४६ | चांगले |
| ७ | जास्त अनुभवी शिक्षक | ४३३ | २३.५० | चांगले |
| ८ | समुपदेशन प्रशिक्षित शिक्षक | २३३ | २१.८८ | चांगले |
| ९ | समुपदेशन अप्रशिक्षित शिक्षक | २७६ | २३.०८ | चांगले |

**११. परिकल्पनांचे परिक्षण**

सदर संशोधनासाठी संशोधकाने एकूण ४ शून्य परिकल्पना मांडल्या होत्या. या परिकल्पनांचे परिक्षण करण्यासाठी संशोधकाने मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांतील शिक्षकांचे समुपदेशन ज्ञानाचा विचार केला. शून्य परिकल्पनांचे परिक्षण करण्यासाठी शिक्षक व शिक्षिकांच्या समुपदेशन ज्ञान कसोटी मिळालेल्या प्राप्तांकावरून मध्यमान, टी— मूल्य काढण्यात आले.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**कोष्टक क्र ४ शिक्षक आणि शिक्षिकांच्या समुपदेशन ज्ञान कसोटीतील प्राप्तांकांचे मध्यमान आणि टी मूल्य**

| परिकल्पना | घटक | एकूण | मध्यमान | टी—मूल्य (मिळालेले) | शून्य परिकल्पना |
|---|---|---|---|---|---|
| १. | शिक्षक | १८२ | २०.१७ | ४.०० | अस्वीकार |
| | शिक्षिका | ३२७ | २४.७९ | | |
| २ | शिक्षणशास्त्र पदवीधारक शिक्षक | ४०५ | २३.८९ | २.२८५ | अस्वीकार |
| | शिक्षणशास्त्र पदविकाधारक शिक्षक | ४०५ | २१.०७ | २.२८५ | अस्वीकार |
| ३ | कमी अनुभवी शिक्षक | ७६ | २१.४६ | २.०६९ | अस्वीकार |
| | जास्त अनुभवी शिक्षक | ७६ | २३.५० | २.०६९ | अस्वीकार |
| ४ | समुपदेशन प्रशिक्षित शिक्षक | २३३ | २१.८८ | १.१९५ | स्वीकार |
| | समुपदेशन अप्रशिक्षित शिक्षक | २७६ | २३.०८ | | |

**स्वाधिनता मात्रा ५०७ (५०९—२) करीता ०.०५ स्तरावर कोष्टकातील t मूल्य १.९६*

## ११. संशोधनाचे निष्कर्ष

१. शालेय शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान चांगले आहे.

२. शिक्षिकांचे समुपदेशन ज्ञान शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानापेक्षा जास्त आहे. शिक्षक आणि शिक्षिकांच्या समुपदेशन ज्ञानात असणारा फरक सार्थ आहे.

३. शिक्षणशास्त्र पदवीधारक शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान शिक्षणशास्त्र पदविकाधारक शिक्षकांपेक्षा अधिक आहे. शिक्षणशास्त्र पदवी आणि पदविका प्राप्त शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानातील फरक सार्थ आहे.

४. जास्त अनुभवी शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान कमी अनुभवी शिक्षकांपेक्षा जास्त आहे. कमी अनुभव व जास्त अनुभव असलेल्या शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानातील फरक सार्थ आहे.

५. समुपदेशन विषयक प्रशिक्षित व अप्रशिक्षित शिक्षकांचे समुपदेशन ज्ञान सारखेच आहे. समुपदेशन विषयक प्रशिक्षित व अप्रशिक्षित शिक्षकांच्या समुपदेशन ज्ञानातील फरक सार्थ नाही.

## संदर्भ सूची

*दुनाखे, अरविंद (१९९८), शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, पुणे नूतन प्रकाशन*

*बापट, भालचंद्र. गोपाळ (१९८८), शैक्षणिक संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे.*

*देशपांडे, चंद्रशेखर, कुमटेकर मेधा, देशपांडे सविता, देसले वसंत, रसाळ पुंडलिक, कुलकर्णी वसुधा (२०१०), समुपदेशन शास्त्रीय प्रक्रिया व उपयोजन, पुणे, उन्मेष प्रकाशन.*

*चव्हाण, दिपक व मुळे, संदीप (२०१०), शैक्षणिक संशोधन आराखडा, नाशिक इनसाईट पब्लिकेशन्स्.*

*मुळे, रा. श. व उमाठे, वि. तु. (१९८७), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथनिर्मिती मंडळ.*

*चव्हाण, माधुरी. दिपक (२००७) पुणे शहरातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विदयार्थ्यांचे पर्यावरण ज्ञान आणि पर्यावरण अभिवृत्ती यांचा अभ्यास, पुणे विद्यापीठ, पुणे, एम.फिल. संशोधन अहवाल.*

*यशदा, पुणे (२०१२—१३) अभ्यास साहित्य—राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान शिक्षक प्रशिक्षण, पुणे, यशदा.*